**कृतिपत्रिका नमुना (द्वितीय भाषा)**
**विषय - मराठी - संयुक्त भाषा (आंतरभारती)**
**इयत्ता - ९ वी** **गुण - ४०**

## विभाग १ गद्य

**अ- १ गद्य उतारा (पठित)** ३

शब्दजाल (वेब) पूर्ण करा.




**अ- २ पुढील कृती करा** १

दिलेल्या शब्दांसाठी परिच्छेदात आलेले विरूद्धार्थी शब्द ओळखून ते लिहा.

| | |
|---|---|
| द्वेष | |
| सुख | |
| अशुद्ध | |
| दैवी | |

(हरवण्याचे प्रकार तरी किती? खेळामध्ये प्रतिस्पर्धी संघाला हरवणे, पुस्तक वाचण्यात हरवणे, स्वत:च्या भूतकाळात हरवणे कुणाच्या प्रेमात हरवणे या सगळ्याच हरवण्यातला आनंदही वेगळाच. कधी कधी दुसऱ्याच्या वस्तू हरवल्या तर आपण बरं झालं म्हणून आनंद व्यक्त करतो, परंतु हा शुद्ध स्वरूपातला आनंद नव्हे. याला आपण 'आसुरी' आनंद म्हणतो. स्वत:च्या वस्तू हरवणे यात मात्र दु:खच असते. ते स्वाभाविक असते. कारण हरवलेली वस्तू 'आपली' असते. 'आपलेपणा' आणि 'दु:ख' यांच्यात असे अतूट नाते असते. आपली 'वस्तू' असो वा 'व्यक्ती'. आपलेपणातला 'दुरावा' दु:खदायकच. एक तरी व्यक्ती अशी शोधून सापडेल का की जिला स्वत:ची वस्तू हरवल्यानंतर दु:खाऐवजी आनंद झाला आहे? याचं उत्तर माझ्याकडे मात्र 'होकारार्थी' आहे.

''आल्याचे सुख ना गेल्याचे दु:ख'' अशा वृत्तीने पाहणारा मी 'स्थितप्रज्ञ' नाही किंवा साधुपुरुष वगैरे नाही; पण हातून गेलेल्या गोष्टीविषयी उगीचच मी हळहळत बसत नाही. या लहान मुलांच्या भांडणाचा प्रसंग पाहून मी अधिकच अंतर्मुख झालो.)

**अ- ३** आनंदाने जगण्याची तुमची कल्पना थोडक्यात लिहा. १

**२ ब १ - पुढील कृती करा** ३

**आकृतीबंध पूर्ण करा**




**ब २- खालील कृती करा** १

**दिलेल्या शब्दांचे लिंग बदलून लिहा**

जसे -

| | |
|---|---|
| सेवक | सेविका |
| वडील | |
| लेखक | |

१
२
३
४

(बंडूच्या घराच्या दरवाजातच बंडूच्या सेवकानं अण्णांचं अगदी हात जोडून स्वागत केलं. हा सेवक म्हणजे कुणी गडीमाणूस वगैरे नव्हता. हा सेवक म्हणजे बंडूने स्वत: तयार केलेला यंत्रमानव होता. घरातला स्वयंपाक, स्वच्छता अशी कामे बंडू त्या यंत्रमानवाकडून करून घेत असे. सर्वांमध्ये मिळून मिसळून वागणारा, दुसऱ्यांवर छाप पाडून आपलसं करणारा बंडू सर्वांनाच प्रिय होता. आता इतका मोठा असूनही सर्वजण त्याला बंडू म्हणूनच हाक मारीत. त्याचे खरे नाव होते सत्येन भट. बंडूची बारावीची परीक्षा संपून नुकतीच सुट्टी सुरू झाली होती. बंडूचे वडील श्री. नारायण भट हे विज्ञानलेखक होते. विज्ञान विषयावरील अत्यंत दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह त्यांच्या घरी होता. त्यांनी स्वत: प्रयोग करून घरात उपयोगी पडतील अशी वैज्ञानिक साधने तयार केलेली होती. त्यांचे घर म्हणजे एखादी प्रयोगशाळा वाटावी असे होते.)

**ब ३-पुढील कृती करा** २

तुझ्या शाळेतील 'विज्ञान' प्रयोगशाळेत पाहिलेल्या वस्तुंची यादी तयार करा.

## विभाग - २ पद्य

**अ** खालील कविता वाचून दिलेल्या कृती करा.

सोन्याच्या धारा, चंदेरी वारा
पाऊस आला, उडत भरारा
थेंबावर थेंब, डोंगर चिंब
खुलून दिसे, आभाळबिंब
ये रे पावसा, ठुमकत असा
देईन तुला, मोत्यांचा पसा
पावसाची धार, डोले शिवार
चोहिकडे दिसे, हिरवे हिरवेगार

**अ) - १ वरील पदयाच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **२**

१) चौकट पूर्ण करा.

पावसाचे चित्र रेखाटले कवितेतील घटक

अ) - **१** सोन्याच्या - [ ] : : चंदेरी : : [ ] **१**

**अ) - २ पावसामुळे होणारे सृष्टीतील बदलाचे वर्णन सांगणारी पाच वाक्ये लिहा** **२**

**ब खालील कविता वाचून दिलेल्या कृती करा.**

कवितेच्या गावा जावे<br>
सुखे सचैल डुंबावे<br>
आल्हादाच्या तरंगात<br>
कवितेचे गाव आहे<br>
हृदयाच्या तळापाशी<br>
छाती फाडून दाखवा<br>
अमूर्त त्या शब्दराशी<br>
कवितेच्या गावामध्ये<br>
सत्य येई वसतिला<br>
असत्याच्या उरावर<br>
झेंडा न्यायाचा रोविला<br>
कवितेच्या गावी नाही<br>
घर दार आणि गोत<br>
संसाराच्या पलिकडे<br>
आहे मानव्याचं नातं

**ब - १ पुढील कृती करा.** **२**

**कवितेच्या गावात आढळणाऱ्या गोष्टी**

**ब - २ खालील कृती करा.** **१**

योग्य पर्याय शोधून वाक्य पूर्ण करा.

कवितेच्या गावा जावे कवितेतून कवीने मांडलेला विचार

अ) जीवनात माणुसकी महत्त्वाची आहे

ब) जीवनात सत्य महत्त्वाचे आहे

क) जीवनात न्याय महत्त्वाचा आहे

**ब - ३ पुढील कृती करा**

**'मैत्रीचे नाते जपण्यासाठी मी हे करेन'**

## विभाग - ३ व्याकरण

अ. पुढील चौकटीतील अचूक शब्द ओळखा २

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | आसूरी | आसुरि | आसुरी |
| (२) | आकरोश | आक्रोश | आर्कोश |

**ब) वाक्प्रचार व अर्थांची योग्य जुळणी करून वेब पूर्ण करा.** २




**क) खालील वाक्यातील काळ ओळखा. (फक्त २)** २

(१) पक्षी दिगंतरा जातील.

(२) त्याने न्यायाचा झेंडा रोवला.

(३) ईदच्या दिवशी मी तिला सलाम केला.

## विभाग - ४ उपयोजित लेखन

अ) पत्रलेखन ४

शहरात
डेंग्यूचा प्रकोप
रुग्णालये गर्दीने ओथंबली

डेंग्यूच्या वाढत्या प्रादुर्भावाकडे लक्ष वेधणारे पत्र मा. आरोग्याधिकारी यांना लिहा.

**किंवा**

डेंग्यूपासून वाचण्यासाठी काय उपाययोजना करता येतील याविषयी मित्रास पत्र लिहा.

**ब) कथालेखन** ४

गरीब मुलगा --- कोणास मदत न करू शकण्याची खंत --- मोठा अपघात --- अपघातातील रुग्णांना रक्तदान --- अनेकांचे प्राण वाचणे ---- खंत दूर --- प्रशंसा.

**किंवा**

**संवाद लेखन**

'कृषिभूषण' पुरस्कार मिळालेला शेतकरी व तुमच्यात झालेला संवाद १० ते१२ ओळीत लिहा

**क)** **प्रसंगलेखन** ४

ज्ञानगंगा घरोघरी

| |
|---|
| ज्ञानविकास विद्यालय राहुरी जि. नगर<br>आदर्श विद्यार्थी पुरस्कार वितरण सोहळा<br>**हस्ते मा. शिक्षणाधिकारी**<br>**दि. ८ जाने. २०१६**<br>**स्थळ - शाळेचे सभागृह** |

हा पुरस्कार तुम्हाला स्वत:ला मिळाला आहे अशी कल्पना करून आलेला अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.